# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २३ – अंक क्र. २



कार्यकारिणी समिती
(२००८ – २००९)

अध्यक्ष
श्री. अजय बेळंबे
(७२४–९३४–५५२७)

उपाध्यक्ष
श्री. नितिन हत्तंगडी
(७२४–३२७–२१८९)

सचिव
श्री. महेश साने
(४१२–३६७–७७५१)

कोषाध्यक्ष
सौ. सोनाली पाटील
(४१२–३६७–१७७८)

वार्तापत्र संपादक
डॉ. अरुण जतकर
(४१२–३७२–५२८३)

कार्यकारी सभासद

सौ. अर्चना चौक
(४१२–२५९–८७४०)

सौ. सुचिता लंबोर
(४१२–४८६–३८३०)

श्री. बिपिन साळुंखे
(७२४–४७३–१०९०)

श्री. संदीप सबनीस
(४१२–९७३–९५१७)

सौ. मीनल देशमुख
(७२४–७४१–६३४२)

श्री. तुषार लोवलेकर
(७२४–९३५–५४८४)

सौ. अमीता आंबे
(७२४–९६९–१०३३)

सौ. शिल्पा साबू
(७२४–७७८–४८९८)

श्री. अक्षय राजहंस
(२१५–९००–२६५०)

श्री. विष्णु धर्माधिकारी
(४१२-३६६–१९७९)


नमस्कार मंडळी!

बऱ्याच दिवसांनी पुन्हा एकदा वार्तापत्राद्वारे आपली भेट होते आहे. स्टीलर्सच्या आणि पेंग्विन्सच्या दैदीप्यमान यशाने सर्वांच्या अंगावर मूठभर मांस चढवले आहेच. आता या वर्षाच्या पुढील काळात आपल्याला असाच मनमुराद आनंद लुटता येईल – महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमांद्वारे ! सुरुवात या महिन्यातील पिकनिकपासून. सर्वत्र गाजत असलेला 'मी शिवाजी राजे भोसले बोलतोय' हा चित्रपट पुढच्या महिन्यात. ऑगस्टमधे गणेश चतुर्थीचा सोहळा, सप्टेंबरमधे 'रंगसंगीत' कार्यक्रमाची आतषबाजी आणि या वर्षाची सांगता दिवाळीच्या भरगच्च कार्यक्रमाने. सर्व नीलपत्रधारी सभासदांचे, आणि विशेषकरून ज्यांनी प्रथमच नीलपत्र–सभासदत्व घेतले आहे त्यांचे मनःपूर्वक आभार. आता आणखी फक्त ३ नीलपत्रधारी सभासद मिळाले की या वर्षीचे ध्येय (९०) पुर होईल. आमच्या आवहनाला हा जो भरघोस प्रतिसाद मिळाला आहे, त्याच्या बळावर आपणां सर्वांच्या पसंतीला पुरेपूर उतरतील असे कार्यक्रम सादर करणे शक्य होणार आहे.

आपला स्नेहाभिलाषी,

अजय बेळंबे

## संक्रांतीच्या कार्यक्रमाचा आढावा –

मकर संक्रांतीचा गोड कार्यक्रम दि. २४ जानेवारी २००९ रोजी हिंदु–जैन मंदिराच्या सभागृहात मोठ्या थाटामाटात पार पडला. दर वर्षीप्रमाणे यंदाही पिट्स्बर्गच्या परिसरातील मराठी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

विविध खाद्यपदार्थांच्या आस्वादाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. भेळपुरी आणि चमचमीत चटण्या यांच्या साथीने चुरचुरीत व चुटचुटीत गप्पाटप्पांना चांगलाच रंग चढला. उंची दागदागिने व कपडे परिधान करून आलेल्या आनंदी व हासऱ्या चेहऱ्यांच्या जमावाने सभागृह बघता बघता भरून गेले. लवकरच लहानमोठ्यांसाठी आखलेले खेळ सुरू झाले आणि बरीच मंडळी तिकडे वळली. त्यानंतर डॉ. अस्मिता रंगनाथन यांनी स्व–लिखित काव्यमय रामायणाच्या वाचनाने वातावरणात भाविकता आणली. नंतर हळदीकुंकू आणि संक्रांतीची वाणे लुटणे या पारंपरिक रिवाजांचे पालन झाले. पोटपूजेची वेळ होताच पाव–भाजी, पीत्झा, पुलाव, मिश्र फळांचे शिकरण (Fruit Salad), असे चविष्ट पदार्थ हजर होऊन त्यांनी सर्वांच्या जिभेचे चोचले पुरवले आणि घरगुती गूळपोळ्यांनी सर्वांचे तोंड गोड केले.

खेळ, गप्पागोष्ट आणि मनपसंत आहार यांनी तृप्त झालेली मंडळी दहाच्या सुमारास आपापल्या घरी जायला निघाली. तिळगुळाचा गोडवा मात्र मनात रेंगाळत राहिला.


आभार :– लहानमोठ्यांचे मजेदार खेळ सौ. मीनल देशमुख आणि सौ. सुचिता लांबोर यांनी आयोजित केले व यशस्वीरित्या हाताळले. सौ. अमिता आंबे, सौ. विनीता बेळंबे, सौ. मनाली साने आणि सौ. अनिता हत्तंगडी यांनी स्वयंपाकात सिंहाचा वाटा उचलला. तसेच कार्यकारिणी समितीच्या इतर सभासदांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी सढळ हाताने मदत केली. संक्रांतीचा तिळगूळ भारतातून आणण्याचे गोड काम श्री. तुषार लोवलेकर यांनी केले.

# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २३ — अंक क्र. २


## — मराठी चित्रपट —

'राजकारण' हा चित्रपट उत्तर अमेरिकेत सर्वात प्रथम पिट्स्बर्गच्या महाराष्ट्र मंडळातर्फे, शनिवार दि. २८ मार्च २००९ रोजी दाखवण्यात आला. मराठी सिनेसृष्टीच्या चाहत्यांनी चित्रपटाला हजेरी लावली. मध्यंतरात चहाकॉफी व समोशांबरोबर गप्पाही रंगल्या. चित्रपट खूप आवडल्याचे बऱ्याचजणांनी मंडळाला कळवले आहे.

आभार :— फिलाडेल्फियाचे श्री. मोहन रानडे यांनी हा चित्रपट मंडळाला उपलब्ध करून दिला. युनिव्हर्सिटी ऑफ् पिट्स्बर्गच्या ग्रॅज्युएट स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ डिपार्टमेंटमधील सभागृहात चित्रपट दाखविण्याची परवानगी डॉ. प्रदीप फुले यांच्या प्रयत्नाने मिळाली.

## — २००९ सालातील पुढील कार्यक्रमांची रूपरेषा —

### १. पिकनिक

तारीख, वेळ — शनिवार, दि. २० जून, २००९; सकाळी ११ पासून

स्थळ — एल्म ग्रोव्ह, पीटर्स टाउनशिप, साउथ हिल्स

Mandal has scheduled Picnic from 11 AM onwards on 20 June 2009 at the Elm Grove in Peters Township, South Hills.

- रविवार दि. २१ जून रोजी दुपारी २ ते ४:३० या वेळात श्री वेंकटेश मंदिराच्या सभागृहात एकांकिका स्पर्धा आयोजित केली आहे. पिट्स्बर्गच्या कलाकारांची 'व्हर्च्युअल रिॲलिटी' आणि न्यू जर्सीतील कलाकारांची 'मुक्तिधाम' अशा दोन एकांकिका या स्पर्धेत सादर केल्या जातील. परीक्षक ज्या एकांकिकेची निवड करतील ती एकांकिका बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात सादर केली जाईल. याबाबत सर्वांना ई—पत्राद्वारे आमंत्रण पाठवण्यात आले आहेच.

### २. मराठी चित्रपट — मी शिवाजीराजे भोसले बोलतोय — जुलै २००९.

इतर सर्व तपशील ई—पत्राद्वारे कळवण्यात येतील.

### ३. गणेश चतुर्थी —

तारीख, वेळ — रविवार, दि. ३० ऑगस्ट, २००९; सकाळी १०:३० पासून

स्थळ — हिंदु-जैन मंदिर

Mandal will celebrate Ganesha Chaturthi on Sunday, 30 August 2009. The celebration will begin at 10:30 AM in the Hindu-Jain Temple in Pittsburgh, PA.

### ४. रंगसंगीत —

तारीख, वेळ — दि. १२ सप्टेंबर, २००९

स्थळ — श्री वेंकटेश्वर मंदिर सभागृह

### ५. दिवाळी —

तारीख, वेळ — शनिवार, २४ ऑक्टोबर, २००९; दुपारी ४ पासून

स्थळ — या कार्यक्रमाचे इतर तपशील पुढील वार्तापत्रातून कळविण्यात येतील.

Mandal will celebrate DIWALI on Saturday, 24 October 2009. Further details will be published in the future newsletters.

---

## — नांदा सौख्यभरे —

- युनियनटाउनचे डॉ. किशोर व डॉ. सौ. उषा जोशी यांची कन्या डॉ. शीला हिचा विवाह ईरी, पेन्सिल्वेनिया येथील डॉ. अभय गोखले याच्याशी दि. ११ एप्रिल २००९ रोजी झाला.

# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २३ — अंक क्र. २


- क्रॅनबेरी टाउनशिपमधील श्री. प्रमोद व सौ. स्वरूप नेमळेकर यांच सुपुत्र चिरंजीव श्री. आदित्य याचा विवाह मिनियापोलिस, मिनिसोटा येथील कु. अपर्णा बालसुब्रह्मण्यम हिच्याशी दि. २९ मे २००९ रोजी झाला.

उभय नव—दाम्पत्यांना मंडळातर्फे हार्दिक अभिनंदन आणि दीर्घ आणि सुखी वैवाहिक जीवनासाठी अनेकोत्तम आशीर्वाद !

## — हाय स्कूल ग्रॅज्युएशन —

- श्री. सुनील व डॉ.सौ. किरण देवरस यांचा मुलगा अनिश हाय स्कूल शिक्षण संपवून कॉलेजला जाण्याच्या तयारीत आहे.

## — हार्दिक अभिनंदन —

- डॉ. मनोहर प्रियदर्शन यांचा कथासंग्रह कोल्हापूरच्या अजब प्रकाशनातर्फे या वर्षी प्रकाशित होत आहे.
- सौ. सुचिता कुलकर्णी—लांबोर यांनी पुढील दोन वर्षे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीत पिट्स्बर्गच्या महाराष्ट्र मंडळाचे प्रातिनिधित्व करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

## — दुःखद निधन —

डॉ. संजय लांबोर यांच्या मातोश्री सरला लांबोर यांना दि. १६ मार्च २००९ रोजी देवाज्ञा झाली. मंडळाचे सर्वजण त्यांच्य व त्यांच्या कुटंबीयांच्या दु?खात सहभागी आहेत. ईश्वर मृतात्म्यास सद्गति देवो.

### मंडळाने दिलेल्या देणग्या —

दरवर्षीप्रमाणे मंडळाने 'एकल विद्यालय फाउंडेशन ऑफ् यू.एस.ए.' या संस्थेस २००९ साली मंडळाने ७३० डॉ. ची देणगी दिली. ही संस्था भारतातील लहान लहान गांवांमधे केवळ एका खोलीत बसणाऱ्या प्राथमिक शाळा चालवते. आपल्या मंडळाने दिलेल्या देणगीचा उपयोग नांदेड जिल्ह्यातील दोन शाळांसाठी केला जाईल.

## सर्व सभासदांस जाहीर आवाहन

मंडळ पुन्हा एकदा खालील गोष्टी सर्वांच्या निदर्शनास आणू इच्छिते —

- मंडळ दरवर्षी ७३० डॉ. भारतातील एकल विद्यालयांना देणगी म्हणून पाठवते.
- गणेशपूजेच्या प्रसंगी हिंदु—जैन मंदिरात उपस्थित असलेल्या सर्व मंडळींस मंडळ महाप्रसाद म्हणून भोजन देते व त्यासाठी शुल्क आकारले जात नाही.
- नवीन कायद्यांनुसार गेल्या वर्षापासून मंडळास एक खास विमा उतरविणे (Liability Insurance) आवश्यक झाले आहे.

या सर्व गोष्टींचा खर्च नीलपत्रधारी सभासदांनी भरलेल्या रकमेतून निभावून न्यावा लागतो. म्हणून सर्वांना नम्र विनंति आहे, की जास्तीत जास्त मंडळींनी नीलपत्रधारी सभासद व्हावे. तसे घडून आल्यास गणेशपूजेच्या प्रसंगी अतिरिक्त (additional) देणगी जमा करण्याची आवश्यकता कमी होईल. तसेच भारतातून एकदोन उत्तम कलाकार आले, तर त्यांचे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी लागणारे आर्थिक बळ मंडळास लाभेल.

# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २३ — अंक क्र. २


## — एल्म ग्रोव्ह पार्ककडे जाण्याचे मार्गदर्शन —

## – Directions to the Elk Grove Park –

**From Northern and Western Suburbs Via I-79**

- Take Exit 48 towards Southpointe/Hendersonville (this is ~ 8 miles South of the intersection of I-79 with I-279 in Carnegie).
- Keep left at the fork in the ramp
- Turn left on to Southpointe Blvd.
- After 0.6 mile, turn left on to Morganza Rd.
- After 0.4 mile, turn right on to Georgetown Rd.
- After 2.5 miles Georgetown Road becomes W. Valleybrook Rd.
- After 1.1 miles on W. Valleybrook Rd. , turn left on to **Old Washington Rd. (Do not get confused with the Washington Rd. and Old Washington Rd., Old Washington Rd. starts off from Valleybrook Rd. Valleybrook Rd. is in between McMurray Rd & Boyce Rd on Rt. 19)**
- After 0.25 mile turn right on to Thompsonville Rd.
- Elm Grove Park is on your left after ~ 0.5 mile.

**From Eastern Suburbs and City of Pittsburg Via Liberty Tubes --**

- Stay in the left lane (follow signs for Dormont/US 19 Truck South) on Liberty Bridge before entering Liberty Tubes.
- After exiting the tunnel continue straight ~ 11 miles on US 19 Truck route which in between turns to US 19 South. (You will pass Fort Couch Road and South Hills Village Mall after 6 miles and Boyce Rd Intersection after 10 miles).
- Turn left on to Moccasin Drive (this is the 2nd light after Boyce Road, about 1 mile after Boyce Road intersection).
- Within 50 yards make first right on to **Old Washington Road. (Do not get confused with the Washington Rd. and Old Washington Rd., Old Washington Rd. starts off from Valleybrook Rd. Valleybrook Rd. is in between McMurray Rd & Boyce Rd on Rt. 19)**
- After 0.6 mile turn left on to Thompsonville Rd.
- Elm Grove Park is on your left after ~ 0.5 mile.

मंडळाची सर्व वार्तापत्रे आणि निवेदने ई–पत्राद्वारे पाठवली जातात. तसेच मंडळाच्या सर्व आगामी कार्यक्रमांविषयींची निवेदने व मंडळाबद्दलची इतर माहिती मंडळाच्या वेबसाइटवर (mmpgh.org) उपलब्ध असते, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच आपल्या परिसरात किंवा आपल्या कामाचे ठिकाणी कोणी नवीन कुटुंब किंवा व्यक्ति आल्यास त्यांनाही मंडळाबद्दल माहिती करून द्यावी व त्यांना मंडळाची वेबसाइट पाहण्यास सांगावे.


२००९ सालासाठी सभासद झालेल्यांची यादी पुढील पानावर पहावी —

Please see on the next page the List of Paid Up Members for 2009 –

# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २३ – अंक क्र. २


## List of Paid-Up Mandal Members for Year 2009

| # | Name | # | Name |
|---|---|---|---|
| 1 | Akshay Rajhans | 37 | Joshi Kishor & Usha |
| 2 | Ambe Prashant & Ameeta | 38 | Joshi Prasad & Sonali |
| 3 | Apte Devdatta | 39 | Kalbhor Chetan & Sonali |
| 4 | Badami Mohan & Nivedita | 40 | Kamat Sonal & Nitin |
| 5 | Belambe Ajay & Vinita | 41 | Kaneri Anup & Sharada |
| 6 | Bhadsavale Anil and Pushpa | 42 | Kar Dilip & Nima |
| 7 | Bhamre Vilas & Manisha | 43 | Karawande Vivek & Prajakta |
| 8 | Bhatte Mahesh & Nivedita | 44 | Kekre Sunder and Vandana |
| 9 | Bhave Ajinkya | 45 | Kotwal Deepak & Nirmal |
| 10 | Bhave Vishakha and Shahikiran D | 46 | Kulkarni Saroj |
| 11 | Bhende Shailesh & Mananda | 47 | Lambore Sanjay & Sucheta |
| 12 | Bhide Shantanu & Veena | 48 | Lele Milind & Anagha |
| 13 | Bokil Parag & Rajashree | 49 | Lovalekar, Tushar & Mita |
| 14 | Bokil Sangeeta & Shailesh | 50 | Mahajan Rajendra & Laxmi |
| 15 | Chaudhari Neela & Narayan | 51 | Manohar Priyadashan & Anagha |
| 16 | Chauk Srinivas & Archana | 52 | Medhekar Niraj & Anjali |
| 17 | Deoras Bhanu | 53 | Mujumdar Ratnakar & Swati |
| 18 | Deoras Sunil & Kiran | 54 | Mulherkar Harshal & Amita |
| 19 | Deshmukh Uday and Meenal | 55 | Nemlekar Pramod & Swarup |
| 20 | Dharmadhikari Vishnu & Vasudha | 56 | Padiyar Krishna & Nandita |
| 21 | Dighe Shyam and Smita | 57 | Palekar Sharad & Alka |
| 22 | Divekar Rajesh and Preeti | 58 | Pandit Santosh & Sunita |
| 23 | Dixit Niranjan & Sudha | 59 | Paranjpe Ajit & Preeti |
| 24 | Dixit Abhijit & Vrushali | 60 | Paranjpe Mohan |
| 25 | Fulay Pradeep & Jyotsna | 61 | Patil Rajesh & Sonali |
| 26 | Ghate Vijay and Sandhya | 62 | Patil Vaishali |
| 27 | Ghatge Prakash & Alka | 63 | Patkar Shailesh & Seema |
| 28 | Ginde Kaustubh & Mayura | 64 | Pearce Usha |
| 29 | Godbole Girish & Deepa | 65 | Pevekar |
| 30 | Godse Ravi & Madhuri | 66 | Ranganathan Asmita |
| 31 | Hattangady Nitin & Anita | 67 | Rao Kanchan |
| 32 | Hegde Subhash & Vaishali | 68 | Ravi and Pooja Tripathi |
| 33 | Jadhav Manish & Monica | 69 | Sabnis Sandeep & Mrunal |
| 34 | Jatkar Arun & Shobha | 70 | Saboo Santosh & Shilpa |
| 35 | Joag Shreeya | 71 | Salunkhe Bipin & Ashwini |
| 36 | Joshi Abhijit and Prajakta | 72 | Sample Vivek & Purnima |

CONTINUED ON NEXT PAGE -

# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २३ – अंक क्र. २


## List of Paid-Up Mandal Members for Year 2009 – Continued..

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 73 | Sane Mahesh & Manali | | 81 | Teredesai Pradeep & Chitra |
| 74 | Sane Mukund | | 82 | Thakar Girish & Leena |
| 75 | Sashital Manisha | | 83 | Umredkar Swati and Rajesh |
| 76 | Shete Prakash & Leena | | 84 | Vaidya Atul & Arundhati |
| 77 | Shinde Dilip & Shakuntala | | 85 | Velankar Sachin & Laxmi |
| 78 | Shinde Sunita | | 86 | Walavalkar Sameer and Mukta |
| 79 | Shirsalkar Advaya | | 87 | Warty Vijay & Aarti |
| 80 | Telang Rahul & Ashwini | | | |

या सर्वांचे मनःपूर्वक आभार!